संत महात्मा बसवेश्वर यांच्या साहित्यातून प्रतिबिंबीत होणारे शिक्षण विषयक विचार : एक चिकित्सक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.अंतर्गत

पीएच.डी. (निष्णांत) पदवी साठीचा

संशोधन आराखडा

: संशोधक :

प्रा. उमाकांत शि.चलवदे

एम.एस्सी., (रसायनशास्त्र) एम.एड., सेट (शिक्षणशास्त्र)

सहशिक्षक जगत् जागृति विद्यामंदिर, चाकूर, ता. चाकूर जि. लातूर.

: मार्गदर्शक :

डॉ. व्यंकटराव का. कदम

एम.ए., (हिंदी) एम.एड., पीएच.डी. (शिक्षणशास्त्र)

सहाय्यक प्राध्यापक,वसंतराव नाईक अध्यापक महाविद्यालय

शिरूर(ता), ता. अहमदपूर. जि. लातूर.

अनुक्रमणिका

अ.क्र.	तपशिल	पष्ठ क्र.
01	मुखपष्ठ	i
02	अनुक्रमणिका	ii
03	प्रास्ताविक	01
04	संशोधनाची गरज व महत्व	03
05	संशोधन शीर्षक	04
06	कार्यात्मक व्याख्या	04
07	संशोधनाची उद्दिष्टे	05
08	संशोधन गृहीतके	05
09	संशोधन पद्धती	05
10	संशोधनाची जनसंख्या व न्यादर्श	06
11	संशोधनाची व्याप्ती	06
12	संशोधन मर्यादा	06
13	माहिती संकलनाची साधने	07
14	सांख्यिकीय तंत्र	08
15	संशोधन कालवधी	08
16	प्रत्यक्ष कार्यवाही	08
17	अंदाजपत्रक	10
18	संशोधन कार्याचे वेळापत्रक	10
19	संदर्भ ग्रंथ सुची	11

01 प्रास्ताविक :-

मानव हा एक समाजशील प्राणी आहे. मानवाची प्रगती ही समाजातून होत असते. मानवाच्या कल्याणासाठी समाजाने अर्थव्यवस्था, धर्मव्यवस्था आणि राजकिय व्यवस्था निर्माण केल्या आहेत. परंतु काळाच्या ओघात या सर्व व्यवस्था निरुपयोगी बनत असतात.मानवाच्या स्वार्थीपणामुळे सर्व शक्ती ही मुठभर लोकांच्या हाती केंद्रित होत असतात. समाजात अनाचार,कर्मकांड,अंधश्रध्दा याचा कळस होतो अशावेळी सामान्य मानसाला साधे जीवन जगणेही जिकरीचे व असहाय्य होऊन बसते. अशावेळी समाज परिवर्तनाचे वारे वाहु लागते. कोणतीही क्रांती घडण्यापूर्वी तिला अनुकूल अशी परिस्थिती लागत असते. आणि ही अनुकूल परिस्थिती एकाएकी जमून येत असे नाही. ती हळूहळू क्रमाक्रमाने बनत जाते. ही परिस्थिती जमवून आणण्याचे काम कित्येक वर्षे-केंव्हा केंव्हा कित्येक शतके चाललेले असते. इसवी सनाच्या पूर्वी सुमारे सहाशे वर्षे आधी बौध्दधर्मासारखी क्रांती घडवून येण्यास अनुकूल परिस्थिती हिंदुस्थानात एक दोन वर्षात आली नाही. ते काम अगोदर कित्येक शतकापर्यंत सुरु होते.

समाजात सामान्य व्यक्तीचे जगने ज्या वेळी अशक्य होते त्या त्या वेळी एखादा व्यक्ती अथवा समुहाला पुढाकार घेऊन दोषपूर्ण व्यवस्था बदलण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करावे लागतात. आपण इतिहासाकडे पाहिले तर अनेक महामानवांनी प्रयत्न केल्याचे दिसून येते. उदा. इ.स.पूर्व सहाव्या शतकात महावीर वर्धमान व गौतम बुद्धांनी त्यावेळी दिलेला लढा हा धर्म व समाजपरिवर्तनाचाच लढा होता. इ.स. सनाच्या सुरुवातीला येशू ख्रिस्त व इ.स. सहाव्या शतकात मोहम्मद पैगंबर यांनी ही समाज परिवर्तनाचा लढा दिला.

आधुनिक काळातही एकोणिसाव्या शतकातील महात्माफुले यांचा लढा, विसाव्या शतकातील राजर्षी शाहु महाराज, महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब अंबेडकरांचा लढा व एकवीसाव्या शतकातील मा.म.देशमुख, आ. ह. साळुंखे, डॉ. नरेंद्र दाभोळकर, डॉ.एम.एम. कलबुर्गी याचा लढा मूळ अर्थाने समाज परिवर्तनाचेच लढे होते व आहेत.

मध्ययुगीन बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक व्यवस्थेमध्ये फार मोठे परिवर्तन घडवून आणण्यासाठी लिंगायत आंदोलन व कल्याण क्रांती धडवून आणली. बाराव्या शतकातही सामाजिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय व्यवस्थेत मूल्य ही रसातळाला गेली होती. समाज अंधश्रद्धा, अनावश्यक रुढी परंपरा, कर्मकांड, दांभिकपणा, जातीयता, विषमता स्त्रीदास्य लिंगभेद मोठया प्रमाणावर दिसून येत होता.

त्यामुळे सामान्य जनता, स्त्री, शुद्रादी, अस्पृश्य , कामगार, शेतकरी यांचे जीवन दुःखमय बनले होते. बहुसंख्य असणारा समाज द्रारिद्रय अज्ञानाच्या अंधकारात खितपत पडला होता

अशावेळी संत महात्मा बसवेश्वरांचा उदय झाला. संत महात्मा बसवेश्वरांनी चिकित्सक प्रवृत्तीने समाजातील दोषांचे अवलोकन करुन ते दोष दूर करण्यासाठी प्रयत्न केले. संत महात्मा बसेश्वरांनी आपल्या विचाराला वृत्तीची जोड देऊन परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. संत महात्मा बसेवश्वर हे एक महामानव, एक सुधारक, एक समतावादी, पुरोगामी, एक मानवतावादी धर्माचे संस्थापक होते.त्यावेळी संत महात्मा बसवेश्वरांनी चालवलेल्या आंदोलनाचे सर्वात मोठे योगदान म्हणजे नारी सन्मान होय.

.

याकाळी अनेक शरणीनी वचन लिहिलेली आहेत. त्यातील काही शरणी म्हणजे अक्कम्मा, अमुगे रायम्मा, आय्दक्की लक्कम्मा, काळव्वे, नागलांबिका, लिंगम्मा, सत्यक्का, निलंम्मा, अक्कमहादेवी या सर्व स्त्रीया वेगवेगळे कार्य करण्याऱ्या व वेगवेगळया जातीतून होत्या. हे सर्व काही घडू शकले ते संत महात्मा बसवेश्वरांच्या विचारा मूळेच त्यामूळे त्यांनी शिक्षणासाठी केलेल्या कार्याच्या संदर्भात दिलेल्या योगदानाचे ऐतिहासिक विश्लेषण करण्यासाठी प्रस्तुत संशोधन हाती घेतले आहेत.

02 संशोधनाची गरज व महत्व :

बाराव्या शतकातील समाजाची अवस्था खुपच दयनीय होती.त्यावेळी समाजामध्ये कर्मकांड,जातीभेद,लिंगभेद,विषमता,दासत्यता खुपच झाली होती.समाजातील विशिष्ट लोकांच्या हातात सर्व शक्ती एकवटलेल्या होत्या. त्यामुळे समाजातील जनतेची पिळवणूक होत होती. या मूळे स्त्री शुद्रादी, कामगार, कष्टकरी व शेतकरी लोकांचे जीवन दरिद्री आणि दुःखदायक झाले होते . समाजातून अनिष्ट प्रथा नाहीशा करण्यासाठी संत महात्मा बसवेश्वरांनी प्रयत्न केले. हे समतेचे शरण आंदोलन संपविण्याचा प्रयत्न अनेक वेळा झाला परंतु हे आंदोलन परिवर्तन चळवळीला व मानवतावादी धर्माच्या स्थापनेला एक दिशा देण्याचे कार्य करीत आहे.

आजही समाजात जातीवाद, धार्मिक आतंकवाद, द्रारिद्रय,भ्रष्टाचार, अंधश्रद्धा यांचे स्तोम वाढलेले आहे. त्यामुळे देशाची एकता आणि अखंडता धोक्यात येत आहे.लिंगभेदाचे प्रमाण वाढत आहे. शिक्षणाची सुद्धा फारशी चांगली स्थिती नाही. या सर्व समस्यावर मात करण्यासाठी संत महात्मा बसवेश्वरांचे विचार, कार्य प्रेरणादायी ठरणार आहे.म्हणूनच प्रस्तुत संशोधन कार्य हाती घेण्यात आलेले आहे.

03 संशोधन शीर्षक :

"संत महात्मा बसवेश्वर यांच्या साहित्यातून प्रतिबिंबीत होणारे शिक्षण विषयक विचार : एक चिकित्सक अभ्यास "

04 कार्यात्मक व्याख्या:

1) **संत महात्मा बसवेश्वर** - मध्ययुगीन काळातील लिंगायत धर्म संस्थापक एक महान संत महात्मा बसवेश्वर.

2) **साहित्य**-बाराव्या शतकातील महात्मा बसवेश्वरानी लिहिलेले वचने.

3) **प्रतिबिंबीत**- वचन साहित्यातून दिसून येणारी शिक्षण विषयक माहिती.

4) **शिक्षण**- मध्ययुगीन काळातील मिळालेली शिक्षणाची संधी.

5) **विचार**- वचन साहित्यातून दिसून येणारा शिक्षण विषयक दृष्टिकोन.

05 संशोधनाची उद्दिष्टे :-

1)संत महात्मा बसेवश्वरांच्या वचन साहित्यांचा अभ्यास करणे.

2)संत महात्मा बसवेश्वरांचा शैक्षणिक तत्वज्ञानाचा अभ्यास करणे.

3)संत महात्मा बसेवश्वरांच्या वचन साहित्यातून प्रतिबिंबीत होणारे शिक्षण विषयक विचार अभ्यासणे.

4)संत महात्मा बसेवश्वरांच्या शिक्षण विषयक विचारांचा शोध घेणे.

06 संशोधन गृहीतके :-

1) मध्ययुगीन काळातील शैक्षणिक स्थिती दयनीय होती.

2) बाराव्या शतकात अनिष्ट रुढी, परंपरा चालत होत्या.

3) मध्ययुगामध्ये विषते विरुध्द सर्व प्रथम आवाज उठविण्यात संत महात्मा बसवेश्वर आग्रणी माणले जातात.

4) शिक्षणासाठी संत महात्मा बसवेश्वरांचे विशेष योगदान मानले जाते.

07 संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधन कार्य गतकाळाशी संबंधित असल्यामूळे संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक व प्राथमिक, दुय्यम स्त्रोतातून माहिती संकलित करण्यासाठी ऐतिहासिक व सर्वेक्षण पध्दती अशा मिश्र संशोधन पध्दतीचा अवलंब करण्याचे योजीले आहे.

08 संशोधनाची जनसंख्या व न्यादर्श :-

प्रस्तुत संशोधनासाठी असंभाव्येतवर आधारित पध्दतीने सहेतुक नमुना निवड पद्धतीने महाराष्ट्र व कर्णाटकातील 100 तज्ज्ञ व्यक्तीची निवड न्यादर्श म्हणून करण्यात येणार आहे. तसेच संत महात्मा बसवेश्वरांचे लिखित व वचन साहित्याच विचार करण्यात आलेला आहे.

09 संशोधनाची व्याप्ती :-

क्षेत्र व्याप्ती :- प्रस्तुत संशोधन बसवकल्याण येथील संत बसवेश्वरांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित आहे.

काल व्याप्ती :- प्रस्तुत संशोधन बाराव्या शतकातील शरण आंदोलनाशी संबंधित आहे.

घटक व्याप्ती :- प्रस्तुत संशोधन हे संत महात्मा बसवेश्वरांच्या कार्यातून प्रतिबिंबीत होणाऱ्या स्त्री शिक्षण विषयक घटकाचा विचार करण्यात आलेला आहे.

10 संशोधन मर्यादा :-

क्षेत्र मर्यादा :- प्रस्तुत संशोधन मराठवाडा व त्यांचे कार्यक्षेत्र असलेल्या बसवकल्याण (कर्नाटक)शहरापुरतेच मर्यादित आहे.

घटक मर्यादा :- प्रस्तुत संशोधन संत महात्मा बसवेश्वरांच्या वचन साहित्यापुरतेच मर्यादित आहे.

आशय मर्यादा :- प्रस्तुत संशोधन संत महात्मा बसवेश्वरांच्या वचन साहित्यातील शिक्षणा विषयक विचारा पुरतेच मर्यादित आहे.

काळ मर्यादा :-

प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष केवळ वर्ष 2014 ते 2017 याकाळापुरतेच मर्यादित आहेत.

विषय मर्यादा :-

प्रस्तुत संशोधनात केवळ संत महात्मा बसवेश्वरांच्या वचन साहित्यातील शिक्षण विषयाचा विचार करण्यात आला आहे.

11 माहिती संकलनाची साधने :-

प्रस्तुत संशोधन प्रक्रियेमध्ये उद्दिष्टांना अनुसरुन विविध प्रकारची वर्णणात्मक व ऐतिहासिक माहिती संकलीत करण्यात येणार आहे. संशोधकाने संत महात्मा बसवेश्वरांची, इतर शरण आणि शरणींची समग्र वचने, शिलालेख, गॅझिटियर्स, विश्वकोश, नियतकालीके इत्यादी पुरावे याचा आधार घेऊन माहिती संकलित करण्याचे योजीले आहे.

उद्दिष्टानुरुप मुलाखतीच्या सहाय्याने तज्ञ व्यक्तीकडून संत महात्मा बसवेश्वरांच्या साहित्यातील शिक्षण विषयक विचार संकलित करण्याचे योजीले आहे.

12 सांख्यिकीय तंत्र :-

प्रस्तुत संशोधनकार्यासाठी संशोधकाने संत महात्मा बसवेश्वर यांची वचने लिखित माहिती व समकाळातील इतर तज्ज्ञ मंडळीकडून मुलाखतीच्या साहयाने माहिती संकलित करण्याचे योजीले आहे.

प्रस्तुत प्राप्त माहितीस अर्थ लावण्यासाठी सांख्यकिय तंत्र म्हणून शेकडेवारी या साधनाचा अवलंब करण्यात येणार आहे.

13संशोधन कालवधी :-

प्रस्तूत संशोधन कार्य सन 2014 ते 2017 या कालावधित पूर्ण होणारे असल्यामूळे उपरोक्त तीन वर्षाचा काळ हा संशोधनासाठीचा कालवधी निश्चित करण्यात आलेला आहे.

14 प्रत्यक्ष कार्यवाही :-

आजच्या संदर्भात जातीयता, धर्मांधता, लिंगभेद स्त्री शिक्षण अनास्था यांचा गोंधळ समाजात चालू आहे. त्यावर उपाय म्हणजे संत महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात सुरु केलेले शरण आंदोलन होय. यासाठी स्त्री शिक्षण हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे. संशोधनाच्या उद्दिष्टांची रचना केलेली आहे. बाराव्या शतकात असलेली स्त्री शिक्षणाची अवस्था त्या वेळच्या रुढी परंपरा यांचा विचार करुन प्रस्तुत संकलित माहितीवरुन निष्कर्ष व शिफारशी मांडण्यात येणार आहेत.

प्रत्यक्ष कार्यवाही :-

प्रस्तुत संशोधन कार्य हे पुढील कार्यपद्धतीनूसार करण्याचे योजिले आहे.

- संशोधन समस्या व अवलोकन
- गरज व महत्व
- उद्दिष्टे रचना
- संशोधन गृहीतकाची मांडणी
- संशोधन पद्धती निवड
- संशोधनाची जनसंख्या व न्यादर्श निवड
- संशोधनाची व्याप्ती व मर्यादा मांडणी
- माहिती संकलनाची साधने निर्मिती
- सांख्यिकीय तंत्र निवड
- निष्कर्ष
- शिफारशी

15. अंदाजपत्रक

अ.क्र	तपशिल	खर्च
01	प्रवास खर्च	19,000
02	छपाई खर्च	12,000
03	पोस्टेज खर्च	2,000
04	झेरॉक्स खर्च	5,000
05	माहिती संकलन	10,000
06	बाईडिंग खर्च	2,000
	एकूण खर्च	50,000

16. संशोधन कार्याचे वेळापत्रक

अ.क्र	कामाचे स्वरूप	कालावधी
01	समस्या निश्चिती	1 महिना
02	संबधित साहित्याचे वाचन	1 महिना
03	संशोधन आराखडा तयार करणे	1 महिना
04	संशोधन साधने तयार करणे	1 महिना
05	माहितीचे संकलन	4 महिना
06	संकलित माहितीचे पथक्करण विश्लेषण	2महिना
07	हस्तलिखित अहवाल लेखन	3 महिना
08	हस्तलिखित अहवाल तपासून मान्य करून घेणे	2 महिना
09	अहवाल टंकलेखन व बांधणी	2 महिना

17 संदर्भ ग्रंथ सुची -

1) Buch M.B; : Third survey ot Research in education, New Delhi, (1978-1983), NCERT

2) Buch M.B; : Fourth surveyot Research in eduaction, New Delhi, (1983-1988) NCERT

3) Buch M.B; : survey ot educational Research; New Delhi (1988-1992), NCERT.

4) Makal,S; : Lingayat-An independent religion, Gulberga : vishwa lingayat Mahassabha.

5) भिंताडे, वि.रा. (2004), शैक्षणिक संशोधन पद्धती, पूणे : नुतन प्रकाशन.

6) कप्पीकेरी, शं. (1991), कबीर और बसवेश्वर तुलनात्मक अध्ययन, दिल्ली :वाणी प्रकाशन.

7) मेनकुदळे, अ.गं (2014), क्रांतिकारी युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वर, भालकी : महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान.

8) जुबेर, रा.ब. (2014), शरण जीवन दर्शन, भालकी : महाराष्ट्र बसव परिषद हिरेमठ संस्थान.

9) पाटील, भी.ब्र. (2015), रणरागिणी कित्तुरची चन्नम्मा, लातूरः शरण साहित्य मंडळ.

10) सोलापूरे, रा. (2014), लिंगायत-एक स्वतंत्र धर्म, लातूर : अरुणा प्रकाशन.

11) पाटील. भी.ब्र. (2014), ऐतिहासिक बसवकल्याण, लातूर : शरण साहित्य मंडळ.

12) पट्टेदवरु ब. (2014) ,बसवत्तवांचे आचरण आणि आपण ,भालकी :महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान.

13) पाटील,भी ब्र. (2015), कुडलसंगम, लातूरः शरण साहित्य मंडळ.

14) मडकी, श. रा. (2013), म. बसवेश्वर-डॉ.आंबेडकर, भालकी : महाराष्ट्र बसव परिषद हिरेमठ संस्थान.

15) जाधव, अ. (2013) महात्मा बसवेश्वर-एक चिंतन, लातूर : लिंगायत सेवा संघ.

16) करडी गुद्दी, रा. म. (2012), बसवतत्व तरंग, भालकीः महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान.

17) बिचेवार, स. शं. (2015) परिवर्तनाचा महामेरु महात्मा बसवेश्वर, पुर्णा : स्वाती प्रकाशन.

जर्नल (मराठी मसिक)

1) बसव पथ (मराठी द्वैमासिक) बसव समिती बंगलोर, नौव्हेबर - डिसेंबर 2011

2) बसव पथ (मराठी द्वैमासिक) बसव समिती बंगलोर, जूलै- ऑगष्ट 2015

3) बसव पथ (मराठी द्वैमासिक) बसव समिती बंगलोर, सप्टेंबर-ऑक्टोबर 2015

4) बसव पथ (मराठी द्वैमासिक) बसव समिती बंगलोर, नौव्हेबर - डिसेंबर 2015

5) लिंगायत दर्शन (मराठी द्वैमासिक) संपादक प्रा. राजशेखर सोलापूरे, नौव्हेबर - डिसेंबर. 2011